भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500 FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐

NAGPUR TREASURY
CD 546540
08 DEC 2023

NOTARIAL REG.
ENTRY No. 2848
DATE: 29/02/2024

Stamp Head Clerk / Sr. Clerk

SEAL OF NOTARY
NARESH K SIDAM
Nagpur (M.S. India)
Reg. No. 9082
My Term Exp On 21-10/2025
GOVT. OF INDIA

## नवीन भागीदारांचे प्रवेश लेखी डीड

मे. शर्मा कन्सट्रक्शन कंपनी
(नोंदणी क्रमांक :- १०१५२ /२००७-०८)
रजि. पत्ता :- (जुना) १७, कॉर्पोरेशन मार्केट, गोकुळपेठ, नागपुर ४४००१०
नवीन रजि. पत्ता :- १४३, इंदु एनक्लेव, १ ला माळा, शंकरनगर वेस्ट, नागपुर ४४००१०

हा नवीन भागीदारांच्या प्रवेश लेखीचे करारनामा आज दिनांक २९ फरवरी २०२४, गुरुवार रोजी नागपुर मुक्कामी-

१) श्री उमेश राधेश्याम शर्मा, वय ५५ वर्षे, धंदा - व्यवसाय, राह. २१८, शंकरनगर, नागपुर-१०
२) श्री रितेश राधेश्याम शर्मा, वय ५० वर्षे, धंदा - व्यवसाय, राह. २१८, शंकरनगर, नागपुर-१०
वरील क्र. १ आणी २, दोन्ही पार्टी या पुढे संयुक्त रित्या विद्यमान भागीदार म्हणुन संदर्भित आहे.

३) श्री आकाश उमेश शर्मा, वय २२ वर्षे, धंदा - व्यवसाय, राह. २१८, शंकरनगर, नागपुर-१०,
४) श्री आदित्य रितेश शर्मा, वय २० वर्षे, धंदा - व्यवसाय, राह. २१८, शंकरनगर, नागपुर-१०,
५) श्री राघव रितेश, वय १८ वर्षे, धंदा - व्यवसाय, राह. २१८, शंकरनगर, नागपुर-१०,

या पुढे वरील क्र. ३ ते ५, तीन्ही पार्टी यापुढे संयुक्तरीत्या नवीन प्रवेशीत भागीदार म्हणुन संदर्भित आहे.

..........२

| | |
|---|---|
| १) दस्ताचा प्रकार / अनुच्छेद क्रमांक | प्रतिज्ञापत्र |
| २) दस्त नोंदणी करणार आहेत काय ? | |
| ३) नोंदणी होणार असल्यास दुय्यम निबंधक कार्यालयाचे नाव | |
| ४) मिळकतीचे वर्णन | |
| ५) मोबदला रक्कम | |
| ६) मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव | शर्मा कन्हैयालाल [illegible] |
| ७) दुसऱ्या पक्षकाराचे नाव | |
| ८) हस्ते असल्यास त्याचे नाव व पत्ता | |
| ९) मुद्रांक शुल्क रक्कम | 500 |
| १०) मुद्रांक विक्री नोंद वही अनु. क्रमांक | 13385 दिनांक 15/12/2023 |
| ११) मुद्रांक विकत घेणार यांची सही | |

एम. आर. रामटेके

मुद्रांक विक्रेता प. क्र. 10/2001 कोड क्र. 4601000
तहसिल कार्यालय, नागपूर (ग्रामीण)

असे कि, दिनांक ०९.०९.२००४ रोजी झालेल्या भागीदारीच्या लेखी पत्राद्वारे आणी तदनंतर दिनांक ०३.०६.२०१५ रोजी झालेल्या भागीदारीची निवृत्तीसह प्रवेश लेखी डीड, तसेच दिनांक ०२.०५.२०१९ रोजी झालेल्या भागीदाराचे निवृत्तीचे लेखी डीड आणी या लेखीपत्रांतर्गत वरील पार्टी नं. १ ते ५, असे सर्वांनी मिळुन जमीनीस विकसीत करण्याचे, ले आउट काढुन अकृषिक प्लॉट टाकुन विकण्याचे, प्लॉट खरेदी विक्री करण्याचे, तसेच जमीन व बांधकाम संबंधी संलग्न व्यवसाय आणी भागीदारांच्या इच्छेनुसार दुसरे व्यवसाय करण्याकरीता भागीदारी संस्था मे. शर्मा कन्सट्रकशन कंपनी, रजि. जुने पत्ता. १७, कॉर्पोरेशन मार्केट, गोकुळपेठ, नागपुर ४४००१०, दिनांक ०९.०९.२००४ रोजी लिहिलेल्या भागीदारीच्या लेखी प्रमाणे दिनांक ०२.०९.२००४ पासुन शुरुवात केली असुन, आज दिनांक २९.०२.२०२४ पर्यंत हे व्यवसाय टणक नाव मे. शर्मा कन्सट्रकशन कंपनी अन्वये करीत आहे. तसेच रजि. नवीन पता.:- १४३, इंदु एनक्लेव, १ला माळा, शंकरनगर वेस्ट, नागपुर ४४००१० येथे आजपासुन राहील.

आणी असे कि, वरील पार्टी क्र. ३ ते ४, यांनी आता दिनांक २९.०२.२०२४ या दिवसापासुन या भागीदारीला जुडण्याची ईच्छा व्यक्त केली असुन भागीदार म्हणुन सहभागी होण्यास मान्य केले आहे आणी विद्यमान वरील पार्टी क्र. १ व २ यांना कसलेही आक्षेप नसुन या तिघांना या भागीदारी संस्था मे. शर्मा कन्सट्रकशन कंपनी च्या व्यवसायात भागीदार म्हणुन समाविष्ट केले आहे.

आणी असे कि, वरील पार्टी क्र. १ व २ यांनी पार्टी क्र. ३ ते ५ यांच्या प्रवेशास मान्यकरुन मान्यता दिलेली आहे. आणी असे कि, वरील पार्टी क्र. ३ ते ५, ह्या सर्वांनी स्वखुशीने भागीदारीत प्रवेशाचे लिखित रेकॉर्ड खालील अटी व शर्तीवर लिहिण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

आता हा करारनामा खालीलप्रमाणे सांगतो.

१. वरील पक्ष क्र. ३, पक्ष क्र ४ आणी पक्ष क्र.५, तीन्ही मे. शर्मा कन्सट्रकशन कंपनी या भागीदारी संस्थेच्या भागीदारीत दिनांक २९.०२.२०२४ पासुन प्रवेशीत झाले आहे.

२. सर्वानुमते आणी सर्व पक्षांमध्ये असे ठरले आहे कि विद्यमान भागीदार वरील पक्ष क्र. १ व २ आणी नवीन भागीदार पक्ष क्र. ३, पक्ष क्र. ४ आणी पक्ष क्र. ४, हे सर्व मिळुन या पुढे मे. शर्मा कन्सट्रकशन कंपनी या भागीदारी संस्थेच्या या व्यवसायातील मालमत्ता, देनदारी, उत्तरदायित्व, स्टॉक इन ट्रेड, मिळकत, फिक्सचर्स व आर्टिकल्स चे संपुर्ण मालक झाले आहे आणी त्यांना हे व्यवसाय या पुढे मे. शर्मा कन्सट्रकशन कंपनी च्या नावे करण्याचे संपुर्ण हक्क प्राप्त झाले आहे.

३. दिनांक ०९.०९.२००४ रोजी लिहिलेल्या भागीदारीच्या लेखी प्रमाणे सर्व अटी व शर्ती विद्यमान आणी नवीन प्रवेशित भागीदारांवर लागु राहील.

४. विद्यमान भागीदार नं १ श्री उमेश राधेश्याम शर्मा व भागीदार नं २ श्री रितेश राधेश्याम शर्मा, सोबत नवप्रवेशित भागीदार नं ३ श्री आकाश उमेश शर्मा , भागीदार नं ४ श्री आदित्य रितेश शर्मा आणी भागीदार नं ५ श्री राघव रितेश शर्मा हे पाचही सोबत वर्किंग पार्टनर म्हणुन धंध्याच्या वृद्धीसाठी आपला वेळ व लक्ष देतील. त्या मोबदल्यात परिस्थिती व आवश्यकतानुसार गरजेत बदल लक्षात घेता, सर्व पाचही पार्टनर यांना दिनांक ०१ अप्रेल २०२३ पासुन खालील प्रमाणे वेतन काढणे योग्य होईल.

.........३

Scanned with OKEN Scanner

अ) वार्षिक परिश्रामिक / वेतनमान खालील प्रमाणे प्रत्येक लेखा वर्षी पुस्तक नफा टक्केवारी म्हणुन गणना केली जाईल.

| पुस्तक नफा (बुक प्रॉफीट) | भागीदारांना देण्यात येणारे वेतनमान |
|---|---|
| पुस्तक नफा च्या प्रथम रु. ३,००,०००/- वर किंवा नुकसान वेळी | रु. १,५०,०००/- किंवा पुस्तक नफाच्या ९०% टक्के, जे जास्त असेल |
| उर्वरीत पुस्तक नफावर | @ ६० % प्रमाणे |

ब) वरील प्रमाणे वेतनमान काढतांना, वर्षा अखेर खाता पुस्तकात दर्शविलेल्या (बुक प्रॉफीट) पुस्तक नफा आणी इन्कम टॅक्स ॲक्ट च्या चॅप्टर - IV D प्रमाणे गणना भागीदारांना वेतनमान न देता किंवा तशी तरतुद न ठेवता त्या आर्थिक वर्षा करीता करण्यात येईल. वर्किंग भागीदारांना दिलेले किंवा देण्यात येणारे वेतनमान पुस्तक नफा मोजल्यावर त्यांच्या नावे चालु खात्यात जमा करण्यात येईल.

क) पाचही भागीदारांना वेतनमान सम प्रमाणात वाटण्यात येईल. श्री उमेश राधेश्याम शर्मा यांना वेतनमान २० टक्के, श्री रितेश राधेश्याम शर्मा यांना वेतनमान २० टक्के, श्री आकाश उमेश शर्मा यांना वेतनमान २० टक्के, श्री आदित्य रितेश शर्मा यांना वेतनमान २० टक्के आणी श्री राघव रितेश शर्मा यांना वेतनमान २० टक्के च्या सम प्रमाणात देण्यात येईल.

ड) वर्किंग पार्टनर वेतनमानापोटी मिळणाऱ्या एकुण रकमेतुन काही रक्कम प्रत्येक महिण्यात काढु शकतात आणि जर वर्षभरात अशी उचललेली रक्कम त्यांच्या वर्षभरातील वेतनमानापेक्षा जास्त होत असेल तर अशी जास्तीची रक्कम त्यांच्या भांडवली रकमेतील त्यांची स्वत:ची उचल धरली जाईल.

५. वर्षा अखेर भागीदारी संस्थेतील निव्वळ नफा, सर्व भागीदारांना वेतन व व्याजाची रकमेच्या त्यांच्या भांडवली खात्यात जमा केल्यानंतर भागीदारीपत्राच्या लेखानुसार आर्थिक वर्षाच्या शेवटी समप्रमाणात वाटण्यात येईल. नफा किंवा नुकसान खालील पाचही भागीदारांच्या नावे समप्रमाणात वाटण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री उमेश राधेश्याम शर्मा | ........ | २०% |
| २. | श्री रितेश राधेश्याम शर्मा | ........ | २० % |
| ३. | श्री आकाश उमेश शर्मा | ........ | २०% |
| ४. | श्री आदित्य रितेश शर्मा | ........ | २० % |
| ५. | श्री राघव रितेश शर्मा | ........ | २० % |

६. आवश्यक असे भांडवल रु. ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार फक्त) सर्व भागीदारांनी जमवले आहेत पण अजुन जर भांडवल लागले तर भागीदार भांडवल गुंतवतील व त्यावर १२ टक्के वार्षिक व्याजाच्या दराने इन्कम टॅक्स ॲक्ट १९६१ च्या सेक्शन ४० (६) (IV) किंवा ईतर इन्कम टॅक्स चे भागीदार पेठी करीता लागु असलेले नियम बंधनकारक राहतील. नुकसानी (तोटा) च्या परिस्थितीत व्याजाचे प्रमाण १२ टक्के पेक्षा कमी अथवा काहीही नाही असे भागीदाराच्या विचार विनियमयाने वेळोवेळी ठरविण्यात येईल.

७. भागीदारी संस्थेचे बैंक खाते कोणत्याही सहकारी, शेड्युल्ड अथवा राष्ट्रीयकृत बैंकेत सर्व भागीदारांच्या संयुक्त नावाने काढण्यात येईल व पाच पैकी कोणताही एक भागीदार त्या खात्यात व्यवहार करतील.

८. भागीदारांच्या वर नमुद वेतनमानात वेळोवेळी दुरुस्ती सर्व भागीदार मिळुन दुरुस्तीपत्रकाद्वारे करु शकतील. अशा कोणत्याही कागदपत्रे किंवा दुरुस्तीपत्रकात जर अंमलात येण्याची प्रभावी तारीख वेगळी नमुद केलेली नसेल तर अशा वेळी ज्या वर्षी असे दुरुस्तीपत्रक लिहुन अंमलात आणले त्या लेखांकन वर्षाच्या पहिल्या दिवशी पासुन त्या दुरुस्तीपत्रकाची अंमलात येण्याची प्रभावी तारीख समजण्यात येईल आणी हे सर्व या भागीदारीच्या लेखी चे भाग राहतील.

९. तसेच सर्व भागीदारांच्या संमतीने आयकर कायदा, १९६१ मधील संशोधन किंवा सुधारणा (किंवा या कायद्याएवजी येणारे नवीन कायदे) अन्वये भागीदारांना देय व्याज, संस्थेची पुस्तक नफा, नफ्याचे वाटप आणि या अडचणी विषयी भागीदारी खत दुरुस्तीची आवश्यकता न ठेवता, वेळोवेळी तत्सम नियमाप्रमाणे अधिक नसेल अशा देयक आणि वितरण यांना परवानगी दिली जात असेल अश्या सर्व सुधारणा साठी सर्व भागीदारांची संमती राहील व दुरुस्तीपत्राची गरज राहणार नाही.

१०. असे कि, वर नमुद खंड वाक्य (क्लॉजेस) व्यतिरिक्त दिनांक ०९.०९.२००४ रोजीच्या भागीदारीच्या लेखीत नमुद असलेले इतर सर्व खंड वाक्य (क्लॉजेस) यांचा या भागीदारी संस्था वर परिणाम असेल.

सर्व पक्षांनी आज रोजी वर नमुद सर्व वर्णन वाचुन, समजुन मान्य करुन खालील साक्षीदारांसमक्ष हस्ताक्षरी दिली.

दिनांक :- २९.०२.२०२४
नागपुर

**विद्यमान भागीदार**

| | |
|---|---|
| १. श्री उमेश राधेश्याम शर्मा | २. श्री रितेश राधेश्याम शर्मा |

**नव प्रवेशीत भागीदार**

| | | |
|---|---|---|
| १. श्री आकाश उमेश शर्मा | २. श्री आदित्य रितेश शर्मा | ३. श्री राघव रितेश शर्मा |



Scanned with OKEN Scanner

साक्षीदार :-

१. ____________________
हितेन्द्र द्वारकाप्रसाद शर्मा

२. ____________________
मुकेश नानकचंद मिश्रा

SEAL OF NOTARY
NARESH K. SIDAM
Nagpur (M.S. India)
Reg. No. 9082
My Term Exp On 21/10/2025
GOVT. OF INDIA

NOTARY
NARESH K. SIDAM
Nagpur Dist. (M.S.) INDIA
REGD. No. 9082
GOVT. OF INDIA

ATTESTED
29/01/2024
NARESH K. SIDAM
NOTARY
NAGPUR DIST (M.S.) INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL